**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग,**

**पुणे**

**स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक/कनिष्ठ लिपीक-नि-टंकलेखक/सहाय्यक भांडारपाल/आरेखक श्रेणी-3(अनुरेखक)/ वाहनचालक/ संशोधन सहाय्यक / प्रयोगशाळा सहाय्यक या संवर्गातील पद भरतीसाठी जाहिरात सन-2014**

महाराष्ट्र शासनाने पुणे सा.बां.परिमंडळाला दिलेल्या प्राधिकारानुसार खालील संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी विहीत शैक्षणिक अर्हता धारण करत असलेल्या पात्र उमेदवाराकडून सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पुणे यांचेमार्फत स्पर्धात्मक परिक्षेसाठी खाली दिलेल्या संवर्गाकरिता केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेत येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा www.pwdpunecircle.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदरची जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या http//www.mahapwd.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**परिक्षेचे वेळापत्रक :-**

| अ.क्र. | प्रक्रिया | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचा कालावधी | दिनांक 19/8/2014 (सकाळी 12.00 पासून) ते दि.02/09/2014 (सायंकाळी 5.30 पर्यंत) |
| 2 | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरल्यानंतर तयार होणा-या चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये परिक्षा शुल्क स्विकृतीचा अंतिम दिनांक | दिनांक 03/9/2014 |
| 3 | लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावर उपलब्ध होण्याचा कालावधी | दिनांक 22/9/2014 (सकाळी 12.00 पासून) |
| 4 | लेखी परिक्षेचा संभाव्य दिनांक व वेळ | दिनांक 28/09/2014 परीक्षा वेळ लेखी परीक्षेचे प्रवेशपत्रावर नमूद केलेनुसार |

भरती प्रक्रियेसंबंधीत सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल वगैरे सूचना www.pwdpunecircle.com या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावर संपर्क साधण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी.

**पदभरती करीता रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे.**

**1) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक**

**वेतनबँड PB-1 5200-20200 ग्रेड पे 2400**

**उपलब्ध पदसंख्या (एकूण 155 पद)**

| अ.क्र. | प्रवर्ग | प्रकल्पग्रस्त 5 टक्के | माजी सैनिक 15 टक्के | महिला 30 टक्के | खेळाडू 5 टक्के | अंशकालीन 10 टक्के | समांतर आरक्षणाच्या व्यतिरिक्त पदे | सर्वसाधारण अपंगासाठी 3 टक्के | एकूण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** |
| 1 | अनुसुचित जाती | 1 | 0 | 2 | 0 | 1 | 8 | 0 | **12** |
| 2 | अनुसुचित जमाती | 1 | 0 | 2 | 0 | 0 | 9 | 0 | **12** |
| 3 | विमुक्त जाती (अ) | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | **4** |
| 4 | भटक्या जमाती (ब) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 0 | **3** |
| 5 | भटक्या जमाती (क) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | **1** |
| 6 | भटक्या जमाती (ड) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | **2** |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 3 | 0 | **4** |
| 8 | इतर मागास वर्ग | 1 | 0 | 3 | 0 | 1 | 9 | 0 | **14** |
| 9 | खुला | 3 | 2 | 17 | 3 | 0 | 55 | 2 (अस्थिव्यंग) | **82** |
| 10 | (ईएसबीसी) शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टया मागास | 0 | 0 | 3 | 0 | 0 | 13 | 0 | 16 |
| 11 | विशेष मागास प्रवर्ग (अ) | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 4 | 0 | 5 |
| | **एकूण** | **6** | **3** | **30** | **3** | **2** | **109** | **2** | **155** |

2) **कनिष्ठ लिपीक-नि-टंकलेखक**

**वेतनबँड PB-1 5200-20200 ग्रेड पे 1900**

**उपलब्ध पदसंख्या (एकूण 59 पद)**

| अ.क्र. | प्रवर्ग | प्रकल्पग्रस्त 5 टक्के | माजी सैनिक 15 टक्के | महिला 30 टक्के | खेळाडू 5 टक्के | अंशकालीन 10 टक्के | समांतर आरक्षणाच्या व्यतिरिक्त पदे | सर्वसाधारण अपंगासांठी 3 टक्के | एकूण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | अनुसुचित जाती | 0 | 1 | 3 | 0 | 0 | 8 | 0 | **12** |
| 2 | अनुसुचित जमाती | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 4 | 0 | **6** |
| 3 | विमुक्त जाती (अ) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 0 | **3** |
| 4 | भटक्या जमाती (ब) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | **2** |
| 5 | भटक्या जमाती (क) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 0 | **3** |
| 6 | भटक्या जमाती (ड) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 0 | **3** |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 0 | **3** |
| 8 | इतर मागास वर्ग | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 8 | 0 | **10** |
| 9 | खुला | 0 | 0 | 3 | 0 | 0 | 7 | (अस्थिव्यंग )1 | **11** |
| 10 | (ईएसबीसी) शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टया मागास | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 0 | **3** |
| 11 | विशेष मागास प्रवर्ग (अ) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 0 | **3** |
| | **एकूण** | **0** | **1** | **10** | **0** | **0** | **47** | **1** | **59** |

3) **सहाय्यक भांडारपाल**

**वेतनबँड PB–1 5200-20200 ग्रेड पे 1900**

**उपलब्ध पदसंख्या (एकूण 7 पदे)**

| **अ.क्र.** | **प्रवर्ग** | **प्रकल्पग्रस्त 5 टक्के** | **माजी सैनिक 15 टक्के** | **महिला 30 टक्के** | **खेळाडू 5 टक्के** | **अंशकालीन 10 टक्के** | **समांतर आरक्षणाच्या व्यतिरिक्त पदे** | **सर्वसाधारण अपंगासांठी 3 टक्के** | एकूण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** |
| 1 | अनुसुचित जाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| 2 | अनुसुचित जमाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 2 |
| 3 | विमुक्त जाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | भटक्या जमाती (ब) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | भटक्या जमाती (क) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | भटक्या जमाती (ड) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| 8 | इतर मागास वर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | खुला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 0 | 3 |
| 10 | (ईएसबीसी) शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टया मागास | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **0** |
| 11 | विशेष मागास प्रवर्ग (अ) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **0** |
| | **एकूण** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **7** | **0** | **7** |

**4) आरेखक श्रेणी-3 (अनुरेखक)**

**वेतनबँड PB-1 5200-20200 ग्रेड पे 1900**

**उपलब्ध पदसंख्या (एकूण 14 पद)**

| अ.क्र. | प्रवर्ग | प्रकल्पग्रस्त 5 टक्के | माजी सैनिक 15 टक्के | महिला 30 टक्के | खेळाडू 5 टक्के | अंशकालीन 10 टक्के | समांतर आरक्षणाच्या व्यतिरिक्त पदे | सर्वसाधारण अपंगासांठी 3 टक्के | एकूण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | अनुसुचित जाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| 2 | अनुसुचित जमाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| 3 | विमुक्त जाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | भटक्या जमाती (ब) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | भटक्या जमाती (क) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | भटक्या जमाती (ड) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 8 | इतर मागास वर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 0 | 3 |
| 9 | खुला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 6 | 0 | 6 |
| 10 | (ईएसबीसी) शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टया मागास | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| 11 | विशेष मागास प्रवर्ग (अ) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| | **एकूण** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **14** | **0** | **14** |

5) वाहनचालक

**वेतनबँड PB-1 5200-20200 ग्रेड पे 1900**

**उपलब्ध पदसंख्या (एकूण 25 पद)**

| अ.क्र. | प्रवर्ग | प्रकल्पग्रस्त 5 टक्के | माजी सैनिक 15 टक्के | महिला 30 टक्के | खेळाडू 5 टक्के | अंशकालीन 10 टक्के | समांतर आरक्षणाच्या व्यतिरिक्त पदे | सर्वसाधारण अपंगासांठी 3 टक्के | एकूण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | अनुसुचित जाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 2 |
| 2 | अनुसुचित जमाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 0 | 4 |
| 3 | विमुक्त जाती (अ) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| 4 | भटक्या जमाती (ब) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| 5 | भटक्या जमाती (क) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 2 |
| 6 | भटक्या जमाती (ड) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| 8 | इतर मागास वर्ग | 0 | 1 | 0 | 1 | 1 | 3 | 0 | 6 |
| 9 | खुला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 5 | 0 | 5 |
| 10 | (ईएसबीसी) शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टया मागास | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| 11 | विशेष मागास प्रवर्ग (अ) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
|  | **एकूण** | 0 | 1 | **0** | 1 | 1 | 22 | **0** | **25** |

6) संशोधन सहाय्यक

**वेतनबँड PB-1 9300-34800 ग्रेड पे 4200/-**

**उपलब्ध पदसंख्या (एकूण 1 पद)**

| अ.क्र. | प्रवर्ग | प्रकल्पग्रस्त 5 टक्के | माजी सैनिक 15 टक्के | महिला 30 टक्के | खेळाडू 5 टक्के | अंशकालीन 10 टक्के | समांतर आरक्षणाच्या व्यतिरिक्त पदे | सर्वसाधारण अपंगासांठी 3 टक्के | एकूण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | अनुसुचित जाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | अनुसुचित जमाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | विमुक्त जाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | भटक्या जमाती (ब) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | भटक्या जमाती (क) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | भटक्या जमाती (ड) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 8 | इतर मागास वर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | खुला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| 10 | (ईएसबीसी) शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टया मागास | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 11 | विशेष मागास प्रवर्ग (अ) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
|  | **एकूण** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | 0 | **1** |

7) **प्रयोग शाळा सहाय्यक**

**वेतनबँड PB-1 5200-20200 ग्रेड पे 1900/-**

**उपलब्ध पदसंख्या (एकूण 2 पद)**

| अ.क्र. | प्रवर्ग | प्रकल्पग्रस्त 5 टक्के | माजी सैनिक 15 टक्के | महिला 30 टक्के | खेळाडू 5 टक्के | अंशकालीन 10 टक्के | समांतर आरक्षणाच्या व्यतिरिक्त पदे | सर्वसाधारण अपंगासांठी 3 टक्के | एकूण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | अनुसुचित जाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | अनुसुचित जमाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | विमुक्त जाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | भटक्या जमाती (ब) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | भटक्या जमाती (क) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | भटक्या जमाती (ड) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 8 | इतर मागास वर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | खुला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 0 | 3 |
| 10 | (ईएसबीसी) शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टया मागास | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 11 | विशेष मागास प्रवर्ग (अ) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | **एकूण** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **3** | **0** | **3** |

- स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता, पुणे सा.बां.परिमंडळ, पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही. **वर दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल.**
- पदभरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, पुणे सा.बां.परिमंडळ, पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.
- केंद्र शासनाच्या पदांच्या यादीनुसार अपंग उमेदवार श्रवणशक्तीतील दोष (HH) चलनवलन सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय दि.19/3/2010 विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू, (एका पायाने

अधू व्यक्ती (O.A.O.L) पात्र असतील.

- ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय / समाजकल्याण आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नावे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांना वरील भरतीच्या पदासाठीच्या लेखी परिक्षेसाठी स्वंतत्ररित्या अर्ज करणे आवश्यक राहिल. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.
- उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.जाहिरातीतील नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.
- शासन निर्णय क्र.प्राणिमं-1214/प्र.क्र.(43/14)/13,दि.5/6/2014 नुसार गट-क मधील कोणत्याही पदासाठी मुलाखत घेण्यात येणार नसल्याने भरती प्रक्रियेत पात्र झालेल्या उमेदवारांची लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्याच आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल व अशा उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधातील मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे तपासणी करिता पडताळणी समितीकडे उपलब्ध करून द्यावी लागतील अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

**पात्रता :-**

खालील नमूद केलेली शैक्षणिक अर्हता/अनुभव दिनांक 16/08/2014 या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदनाम | वय | शैक्षणिक व तांत्रिक अर्हता |
|---|---|---|---|
| 1 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | 18 ते 33 | 1. माध्यमिक शालांत परीक्षा (एस एस सी) उत्तीर्ण असावा.<br>2.शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारा स्थापत्य अभि. सहाय्यकाची एक वर्ष मुदतीची पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण असावा किंवा आर्कीटेक्चरल ड्राफ्टसमन वास्तुशास्त्रीय आरेखक / कन्स्ट्रंक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक) सिव्हिल ड्राफ्टसमन कोर्स स्थापत्य आरेखक हीअर्हता धारण करीत असावा किंवा शासनमान्य स्थापत्य अभियांत्रिकीमधील उच्च शैक्षणिक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अर्हता धारण करीत असावा.<br><br>स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाची लेखी परिक्षा इंग्रजी, मराठी, चालू घडामोडी, सामान्यज्ञान, व बुद्धीमत्ता चाचणी यावर आधारीत एकूण 120 गुणांची व पदांसंबंधीचे तांत्रिक ज्ञान यावर आधारीत एकूण 80 गुणांची परीक्षा घेण्यात येईल. |
| 2 | आरेखक श्रेणी-3 अनुरेखक | 18 ते 33 | 1. एस. एस. सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण व शासनाची इंटरमिजीएट ड्रॉइंग परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>आरेखक श्रेणी 3 (अनुरेखक) या पदासाठी 200 गुणांची लेखी परीक्षा असेल. या पदाची लेखी परिक्षा मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या वर आधारित असेल. |
| 3 | कनिष्ठ लिपीक-नि-टंकलेखक | 18 ते 33 | 1. उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. मराठी टंकलेखनाचा वेग 30 श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग 40 श.प्र.मि. प्रमाणपत्र असणे आवश्यक.<br>3. महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39 दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>कनिष्ठ लिपिक या पदासाठी 200 गुणांची लेखी परीक्षा असेल. या पदाची लेखी परिक्षा मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या वर आधारित असेल. |
| 4 | सहाय्यक भांडारपाल | 18 ते 33 | 1. उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. मराठी टंकलेखनाचा वेग 30 श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग 40 श.प्र.मि. प्रमाणपत्र असणे आवश्यक.<br>3. भांडारविषयक कामाचा किमान 3 वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>4. महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39 दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>सहा. भांडारपाल या पदासाठी 200 गुणांची लेखी परीक्षा असेल. या पदाची लेखी परिक्षा मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या वर आधारित असेल. |
| 5 | वाहनचालक | 18 ते 33 | 1. इयत्ता 4 थी अथवा उच्चतम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>3. हलके व जड वाहन परवाना धारक व 3 वर्ष वाहन चालविण्याचा अनुभवासह आवश्यक<br>4. निर्व्यसनी व शारीरकदृष्टया तंदूरुस्त (सदृढ) असणे आवश्यक.<br>वाहनचालक या पदासाठी शालांत परीक्षा उत्तीर्णपेक्षा कमी अर्हता असल्याने 40 गुणांची लेखी परीक्षा व 50 गुणांची व्यावसायिक (Driving) चाचणी परीक्षा व 10 गुणांची शारीरीक क्षमतेची चाचणी ठेवून उमेदवाराची निवड करण्यात येईल. |
| 6 | संशोधन सहाय्यक | 18 ते 33 | 1. गणित/ भौतिकशास्त्र / रसायनशास्त्र / सांख्यिकीशास्त्र हे मुख्य विषय घेऊन विज्ञान शाखेची द्वितीय श्रेणी उत्तीर्ण किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची कृषी विद्यापीठाची पदवी असणे आवश्यक. तसेच वरील पदवीत्तर डिग्री प्राप्त असल्यास प्राधान्य.<br>ज्या पदांकरिता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदांकरिता परिक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांच्या पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी संबंधीत प्रश्नांचा दर्जा उच्च माध्यमिक शांलात परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील. या पदासाठी 200 गुणांची लेखी परीक्षा असेल. यामध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौद्धिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी 50 याप्रमाणे एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. |
| 7 | प्रयोगशाळा सहाय्यक | 18 ते 33 | 1 भौतिकशास्त्र /रसायनशास्त्र हा मुख्य विषय घेऊन मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी किंवा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कृषी पदवी असणे आवश्यक. ज्या पदांकरिता पदवी ही कमित कमी अर्हता आहे अशा पदांकरिता परिक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांच्या पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी संबंधीत प्रश्नांचा दर्जा उच्च माध्यमिक शांलात परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील. या पदासाठी 200 गुणांची लेखी परीक्षा असेल. यामध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौद्धिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी 50 याप्रमाणे एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. |

**वयोमर्यादेतील सवलत :-**

वयोमर्यादेकरीता उमेदवाराचे दिनांक 16/08/2014 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

सर्वसाधारण उमेदवाराचे वय दिनांक 16/08/2014 रोजी **18** वर्षां पेक्षा कमी नसावे व **33** वर्षां पेक्षा जास्त नसावे.

1. मागासवर्गीय उमेदवार :- 38 वर्षे
2. अपंग /प्रकल्पग्रस्त्/अपंग माजी सैनिक/भूकंपग्रस्त/स्वातंत्र्य सैनिक निर्देशित पाल्य/1991 चे जनगणना कर्मचारी व 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी/शासकीय कर्मचारी- 45 वर्षे.
3. खेळाडू 5 वर्षे सवलत (खुला प्रवर्ग 33 + 5, मागासवर्गीय 38 + 5)
4. अंशकालीन उमेदवार : 46 वर्षे
5. अनुक्रमांक 2 करीता, सन 1980-81 ते 1986-87 च्या दरम्यान शासकीय तंत्रशिक्षण संस्थेचा एक वर्ष मुदतीचा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाच्या पाठक्रमाची परिक्षा उत्तीर्ण- 47 वर्षे
6. माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक : मासैक- 1010/प्र.क्र. 279/10/16-अ, दिनांक 20 ऑगस्ट, 2010 प्रमाणे राहील.

**शासकीय सेवेमध्ये भरती झाल्यास होणारी वित्तलब्धी :-**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | वेतन व इतर भत्ते | पदोन्नतीच्या संधी |
|---|---|---|---|---|
| 1. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | पी.बी.1 5200-20200 ग्रेड वेतन-2400 | मुळ वेतन + इतर भत्ते | उपविभागीय अधिकारी पर्यंत |
| 2. | आरेखक श्रेणी-3 अनुरेखक | पी.बी.1 5200-20200 ग्रेड वेतन-2000 | मुळ वेतन + इतर भत्ते | प्रमुख आरेखक पर्यंत |
| 3. | कनिष्ठ लिपीक-नि-टंकलेखक | पी.बी.1 5200-20200 ग्रेड वेतन-1900 | मुळ वेतन + इतर भत्ते | विशेष अधीक्षक पर्यंत |
| 4. | सहाय्यक भांडारपाल | पी.बी.1 5200-20200 ग्रेड वेतन-1900 | मुळ वेतन + इतर भत्ते | भांडारपाल पर्यंत |
| 5. | वाहनचालक | पी.बी.1 5200-20200 ग्रेड वेतन-1900 | मुळ वेतन + इतर भत्ते | एकाकी पद |
| 6. | संशोधन सहाय्यक | पी.बी.2 9300-34800 ग्रेड वेतन-4200 | मुळ वेतन + इतर भत्ते | एकाकी पद |
| 7. | प्रयोगशाळा सहाय्यक | पी.बी.1 5200-20200 ग्रेड वेतन-2000 | मुळ वेतन + इतर भत्ते | एकाकी पद |

**नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी :-**

1. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
2. सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
3. विहित वयोमर्यादेतील शासकीय, निमशासकीय सेवेतील कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाईन भरावे व अशा परवानगीची प्रत उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे व त्याबाबतची कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावी.

**परिक्षेचे स्वरूप :-**

| अ.क्र. | पदनाम / संवर्ग | परिक्षेसाठीचे गुण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लेखीपरिक्षा | व्यावसायिक परिक्षा | शारिरीक क्षमता चाचणी | एकूण गुण |
| 1. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | 200 | --- | --- | 200 |
| 2. | आरेखक श्रेणी-3 अनुरेखक | 200 | --- | --- | 200 |
| 3. | कनिष्ठ लिपीक-नि-टंकलेखक | 200 | --- | --- | 200 |
| 4. | सहाय्यक भांडारपाल | 100 | --- | --- | 100 |
| 5. | वाहनचालक | 40 | 50 (Driving Test ) | 10 | 100 |
| 6. | संशोधन सहाय्यक | 200 | --- | --- | 200 |
| 7. | प्रयोगशाळा सहाय्यक | 200 | --- | --- | 200 |

**लेख परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व कार्यक्रम :-**

1. लेखी परिक्षेची प्रश्न पत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरूपाची असेल. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. बहुपर्यायी प्रश्नांसाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय निवडावा. (निगेटिव्ह) नकारात्मक गुणपद्धत (मार्क सिस्टिम) अवलंबली जाणार नाही.

2. शासन निर्णय क्र. प्रनिम-2007/प्र.क्र. 46/07/13 अ, मंत्रालय, मुंबई दि. 27/06/2008 मध्ये विर्निधिष्ठ केल्यानुसार लेखी परिक्षेत किमान 45 टक्के गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांपैकी संवर्ग पदसंख्याच्या विहित पटीत गुणानुक्रमे पात्र उमेदवारांची यादी जाहीर करणेत येईल व व्यावसायीक / प्रात्यक्षिक परिक्षा चाचणी करीता पात्र राहतील.

**परिक्षा शुल्क :-**

| अ.क्र. | पदनाम / संवर्ग | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|---|
| 1. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | 300 | 200 |
| 2. | आरेखक श्रेणी-3 अनुरेखक | 300 | 200 |
| 3. | कनिष्ठ लिपीक-नि-टंकलेखक | 300 | 200 |
| 4. | सहाय्यक भांडारपाल | 300 | 200 |
| 5. | वाहनचालक | 200 | 100 |
| 6. | संशोधन सहाय्यक | 300 | 200 |
| 7. | प्रयोगशाळा सहाय्यक | 300 | 200 |

**टिप:-**

1. माजी सैनिकांना परिक्षा शुल्क माफ आहे.
2. उक्त परिक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑन लाईन अर्जा सोबत प्राप्त झालेल्या चलनाव्दारेच रोखीने भरणे आवश्यक आहे.
3. वर दर्शविण्यात आलेले परिक्षा शुल्क हे बँक प्रक्रिया शुल्क वगळून आहे.
4. स्टेट बँक आँफ इंडीया कडून रू. 60/- इतके प्रक्रिया शुल्क आकारले जाईल, सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

**अर्ज करण्याची पद्धत :-**

1. प्रस्तुत पदांकरीता फक्त www.pwdpunecircle.com या अधिकृत संकेतस्थळावरून विहित पद्धतीने भरलेले ऑनलाईन पद्धतीने केलेलेच अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी. व मोबाईल क्रमांक चूकीचा / अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्या द्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी. व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना पुणे सार्वजनिक बांधकाम परिमंडळ, पुणे हे जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
2. ऑनलाईन पद्ध्तीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना www.pwdpunecircle.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत फी भरण्याचे चलन 3 प्रतीमध्ये (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व सार्वजनिक

बांधकाम विभागाची प्रत) उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमूद असलेली आवश्यक ती फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये भरणे आवश्यक राहील. सदरच्या 3 प्रतीपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत व सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रत उमेदवारास स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेकडून परत मिळेल, त्यापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाची मूळ प्रत उमेदवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जमा करावी. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी घेतली जाणार नाही. बँकेत परिक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक 03/09/2014 असा आहे. अंतिम दिनांका नंतर बँकेत परिक्षा शुल्क भरणा-या उमेदवाराचा विचार केला जाणार नाही.

3. उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरल्यानंतर उमेदवाराला त्याची स्थिती www.pwdpunecircle.com या संकेतस्थळावरती पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पाहता येऊ शकेल.

4. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वत:चा वापरातील ई-मेल आयडी आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडीव्दारे होणार असल्याने अचूक ई-मेल आयडी नोंदविणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार असल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. तसेच स्वत:चा अद्ययावत (Latest) विहित नमुन्यातील पासपोर्ट साईज फोटो आणि स्वाक्षरी स्कॅन करुन विहित पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

5. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेनंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन लिंक बंद केली जाईल.

6. अर्जदारांना अर्ज भरण्या संदर्भात काही अडचणी असल्यास त्यासाठी **7776900546/ 47/ 48/ 49** या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

**सर्वसाधारण सुचना :- (कार्यपद्धती, अटी व शर्ती)**

1. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरून विहित परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवाराची स्थिती, परिक्षेची रूपरेषा/ वेळापत्रक/परिक्षकेंद्र / बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर उपलब्ध राहील. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सबब सदर संकेतस्थळाला भरतीप्रक्रीये दरम्यान वेळोवेळ भेट देवून भरती प्रक्रीयेची माहिती / कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्रे डाऊनलोड करून घेणेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.
2. ऑनेलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.
3. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर (निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी) अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा

आढळल्यास, अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल तसेच, एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवंलब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून उमेदवाराचे नाव रद्द करण्यात येईल व नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येवून त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

4. उमेदवारास लेखी परिक्षा व कागदपत्रे पडताळणी इत्यादी करीता स्वखर्चाने यावे लागेल.

5. उमेदवारांने यापूर्वी जरी त्याचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे) नोंदविले असले तरी त्यांने या पदांच्या अधिकृत वेब साईटवर स्वतंत्रपणे विहित शुल्कासहित ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

6. उमेदवारास कार्बनलेस स्वरुपाची उत्तरपत्रिका परिक्षादिनी देण्यात येणार आहे व त्याची प्रत परिक्षाअंती उमेदवारास दिली जाईल.

7. संकेत स्थळावरुन उत्तरतालिका परिक्षा झालेल्या दिवसापासून 5 दिवसात प्रसिध्द केली जाईल जेणेकरुन उमेदवारास स्वत:चे गुण काढता येतील.

8. उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांचे ओ.एम.आर.स्कॅनिंग द्वारे प्राप्त गुण वैयक्तीक रित्या पडताळता येण्याची सुविधा उक्त संकेतस्थळावर परिक्षेनंतर 15 दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यानंतर उमेदवारांची कागदपत्र पडताळणी, प्रात्यक्षिक परिक्षा इत्यादी प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

9. लेखी परिक्षेचे/ प्रात्यक्षिक परिक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. परिक्षेचे प्रवेश पत्र उक्त संकेतस्थळावरुन स्वत: डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल प्रवेशपत्र इतर कोणत्याही पध्दतीने पाठविले जाणार नाहं

10. उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडी बाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्राच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखी परिक्षेच्य प्राथमिक चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृही पात्रतेनुसार अंतिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व या बाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

**अंतिम निवड :-**

1) **पात्र उमेदवारांच्या अंतरिम तसेच अंतिम निकाल वरील संकेत स्थळावर जाहिर करण्यात येईल.**

अ) उमेदवाराची अंतिम निवड हि लेखी / प्रात्यक्षिक परिक्षा/शारीरीक चाचणी परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल.

ब) एकाच स्थानासाठी (Position ) दोन किंवा अधिक उमेदवारांना **समान गुण मिळाल्यास** खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

1. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार त्यानंतर
2. मागास वर्ग उमेदवाराच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमातीमधील नंतर अनूसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (14 व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी 1990 –पूर्वीच्या 28 तत्सम जमाती ), भटक्या जमाती (धनगर व तत्सम ) इतर मागासवर्ग या क्रमाने त्यानंतर
3. शारीरिक दृष्टया अपंग असलेले उमेदवार त्यानंतर
4. माजी सैनिक असलेले उमेदवार त्यानंतर
5. स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य असलेले उमेदवार
6. वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल )
   वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

2) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सादर केलेली सर्व मुळ प्रमाणपत्रे व शासन निर्णयाच्या अटींची सबंधीत नियुक्ती अधिकाऱ्यामार्फत (संबंधीत अधीक्षक अभियंता ) तपासणी करुन पुर्तता झाल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

**विशेष सुचना :-**

1. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, आरेखक श्रेणी-3 (अनुरेखक), कनिष्ठ लिपीक-नि-टंकलेखक, सहाय्यक भांडारपाल या संवर्गातील अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्रातील पुणे /सातारा /कोल्हापूर/सोलापूर /इत्यादी मंडळात नियुक्ती देण्यात येईल. वाहन चालक यांना कोल्हापुर/सांगली व पुणे जिल्हा अंतर्गत जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ, मुळशी, भोर, वेल्हे, पुरंदर, हवेली, शिरुर, दौंड, बारामती, इंदापूर इत्यादी कोणत्याही ठिकाणी नियुक्ती देण्यात येईल. संशोधन सहाय्यक आणि प्रयोगशाळा सहाय्यक यांना दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, पुणे अंतर्गत नियुक्ती देण्यात येईल. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना रुजु झाल्यानंतर विहीत केलेली खातेनिहाय / अन्य परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांची नियुक्ती नियमित समजली जाणार नाही.

2. रूजू झाल्यानंतर विहित केलेली खातेनिहाय /अन्य परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांची नियुक्ती नियमित समजली जाणार नाही.

3. महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसुचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुद्धीपत्रकामधील तरतुदी उमेदवारांस बंधनकारक राहतील.

4. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदली करीता महाराष्ट्र बदली अधिनियम 2005 मध्ये नमुद करण्यात आलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने करण्यात येईल. विनियम व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिसनियम 2005 तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एसआरव्ही 2010/प्र.क्र.2010/10/12/ दि.3/6/2011 मधील निर्देशानुसार अन्यत्र बदलीच्या तरतूदी लागू राहतील.

5. शासन वित्त विभाग निर्णय क्र. अनियो/10/05/126/सेवा - 4 दि. 31/10/2005 नुसार दिनांक 1/11/2005 रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवाराचा नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. तथापी त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना. से. (निवृत्तीवेतन) नियम 1982 व म.ना. से. (निवृती वेतनाचे अंशिकरण) नियम 1984) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

6. शासन सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र. 17/2000/12 दिनांक 28/3/2005 व शासन परिपत्रक एसआरव्ही दिनांक 1/7/2005 नुसार विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ,ब,क व ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापत्र नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

7. शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवाराने सहा महिन्याच्या आत वैदयकीय दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शासकीय रुग्णालयातील वैदयकीय अधिका-याकडून शासकीय सेवेत काम करण्यास पात्र असल्याचे वैदयकीय प्रमाणपत्र नियुक्ती झालेल्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

8. शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारांची नेमणूक त्याचे पुर्वचरित्र व वर्तणूक (पोलीस चौकशी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील व तसा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्यांना सेवेतून काढून टाकण्यात येईल.

9. **मागासवर्गीय आरक्षण :-** विमुक्त जाती (अ) भटक्या जमाती (ब) भटक्या जमाती (क) भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग विशेष मागास वर्ग, **ESBC** (मराठा), विशेष मागास प्रवर्ग- अ (मुस्लिम) या वर्गामधील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दि. 31/3/2014 नंतरचे प्रमाणपत्र (Non Crimilayer Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

नियुक्तीनंतर 6 महिन्याचे आत उमेदवारांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

10. ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी सिमितीकडून करून घेणे आवश्यक राहील.

11. **<u>खेळांडूसाठी आरक्षण</u>** :- फक्त अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी उच्च वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिल केली आहे. क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील प्रमाणपत्र निवडीनंतर नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.

12. **<u>प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण</u>** :- प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

13. **<u>शासकीय व निमशासकीय कर्मचारी</u>** :-त्यांनी त्यांचे अर्ज कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत भरावे. परवानगीची प्रत, कागदपत्रे छाननीच्यावेळी सादर करावी.

14. **<u>महिलांसाठी आरक्षण</u>** :- आरक्षणाची मागणी ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक 31/03/2014 नंतरचे प्रमाणपत्र ( Non Crimilayer Certificate ) कादपत्रे छाननीच्या वेळी सादर करावे.

15. **<u>अंशकालीन उमेदवार</u>** :- सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेंतर्गत तीन वर्षे दरमहा मानधनावर अंशकालीन काम केलेल्या पदवीधर/पदवीधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे आवश्यक असून तशी नोंद ऑनलाईन अर्जात करावी. सदर प्रमाणपत्र व नोंदणीचे प्रमाणपत्र कागदपत्रपडताळणीच्या वेळी सादर करावे.

16. **<u>माजी सैनिकांसाठी आरक्षण</u>** :-सशस्त्र दलात किमान 6 महिने सेवा केलेल्या माजी सैनिक /राजाधिष्ठ अधिकाऱ्यांना सैन्यातील कालावधी अधिक तीन वर्षे इतकी कमाल वयाची सवलत नियुक्तीसाठी देण्यात येईल.

17 **अपंग** :- अपंग संवर्गातील उमेदवाराकडे किमान अपंगत्वाचे प्रमाण 40 टक्के असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे विहीत प्रमाणपत्र असावे. लेखी परिक्षेच्या वेळेस अपंग उमेद्वारास लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्ज करतांना तसा स्पष्ट उल्लेख करावा व परिक्षा शुल्क रू. 100/- अतिरिक्त भरणा करावे. ऐनवेळी लेखनिक पुरविला जाणार नाही.

18 पदभरतीच्या अधिसुचना, शासन निर्णय व परिपत्रके आवश्यकतेनुसार महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावरून उमेदवाराने स्वत: उपलब्ध करून घ्यावीत.

19 निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी त्यांनी सादर केलेले अर्हता प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्रे याची सत्यता शासकीय नियमाप्रमाणे पडताळणी

झाल्यावरच नियुक्तीचे आदेश देणेत येतील.

20 उपरोक्त पदाच्या परिक्षेच्या अनुषंगाने निर्माण होणारी कागदपत्रे माहिती अधिकारी अधिनियम 2005 कायद्याअंतर्गत संबंधित जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून सहा महिने उपलब्ध असतील सहा महितीन्यानंतर सक्षम प्राधिका-याचे मान्यतेने नष्ट करण्यात येतील नंतर या संबंधीची माहिती माहिती अधिकार नियम 2005 अन्वये उपलब्ध होणार नाही.

**जा.क्र. पशा/जाहिरात/भरती/7566/ सन 2014**
**अधीक्षक अभियंता सा.बां. मंडळ पुणे यांचे कार्यालय, पुणे 400 001**
**दिनांक :- 12/08/2014.**

**अधीक्षक अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ व समन्वय,**
**अ अ सा बां मंडळ पुणे 411001**

**प्रत** : उप सचिव आस्थापना, सा. बां. विभाग मंत्रालय, मुंबई. 32 यांना माहितीसाठी सविनय सादर.

**प्रत** : मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, पुणे. यांना माहितीसाठी सविनय सादर.

**प्रत** : सदस्य सचिव कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग पुणे यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.